# अमेरिकन निर्मात्यांचा मराठी चित्रपट “परतु”

अशोक आंबर्डेकर (वॉशिंग्टन डीसी)

## अमेरिकन निर्मात्यांचा मराठी चित्रपट “परतु”

वॉशिंग्टन परिसरांत East West Films नें “परतु” नांवाच्या मराठी चित्रपटाची घोषणा केली आणि ती बातमी ऐकून मनांत कुतूहल निर्माण झालं. पंधरा वर्षांपूर्वी वॉशिंग्टनमधल्या पहिल्या प्रायोगिक चित्रपटाच्या पटकथा लेखनाचं आणि दिग्दर्शनाचं काम केलेलं असल्यामुळें मला या चित्रपटाची जास्त माहिती मिळवण्याची इच्छा झाली. लगेच या चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक नीतिन अडसूळ यांना फोन लावला. आनंदानें प्रतिसाद देऊन त्यांनी भेटायला होकार दिला आणि त्यांच्या सहनिर्मात्यांबरोबर एकत्र बसून बातचीत करायचं ठरलं. आमच्या त्या संवादांतून मिळालेली चित्रपटाची माहिती आपल्यापुढें सादर करत आहे.

**मी: नीतिन, तुमच्या चित्रपटाआधीं East West Films विषयीं माहिती देतां का?**

नीतिन: East West Films ही आमची फिल्म कंपनी मी आणि माझ्या तीन पार्टनर्सनी मिळून वॉशिंग्टन परिसरांत स्थापन केली. स्फूर्तिदायक संदेश देणाऱ्या कथानकांवरचे चित्रपट प्रेक्षकांना सादर करणं हें आमचं उद्दिष्ट आहे. कलात्मक चित्रपट बनवायचे पण केवळ फ़ेस्टिव्हल्ससाठीं आर्ट फिल्म्स नाहीं असं सुरुवातीपासूनच ठरवलं. आम्ही नोकरी एकाच कंपनींत करत होतों. चित्रपटांची आवड या एका दुव्यानें आम्ही मित्र झालों. एक अभिनेता म्हणून मी चित्रपटसृष्टीकडे वळलों. पण लवकरच पटकथालेखन, दिग्दर्शन आणि निर्मिति या गोष्टींचं मला जास्त आकर्षण वाटलं आणि मी पडद्यामागच्या या कामांमध्यें पारंगत व्हायचं ठरवलं.

Darrel: मी Darrel Cox. मलाही अभिनयाची आवड होती. नीतिन आणि मी बऱ्याच वेळां auditions साठीं एकत्र गेलों आहोंत. कौटुंबिक मूल्यं जपणाऱ्या संदेशात्मक कथानकांवर चित्रपट बनवायचे ही कल्पना मला अतिशय आवडली. अभिनय बाजूला ठेवून नोकरींतला माझा management चा अनुभव East West Films साठीं वापरायचं ठरवलं आणि मी एक पार्टनर झालों. कारण चांगल्या कल्पनेवर आधारित चित्रपट यशस्वीरीत्या पडद्यावर आणण्यासाठीं चांगल्या management चीही फार जरूर आहे.

Clark: माझं नांव Clark Macmillian. मला पटकथालेखनाची आवड. माणसा माणसामधल्या प्रेमाच्या, नात्यांच्या कथा, त्यांतले प्रेरणादायक प्रसंग यांचं आकर्षण. त्यामुळें East West Films मध्यें एक लेखक या नात्यानें सक्रिय भाग घ्यायचं ठरवून मी एक पार्टनर झालों.

रुपेश: मी रुपेश महाजन. मला photography ची आवड आणि cinematography चा बराचसा अनुभव. कोणतीही कथा पडद्यावर प्रेक्षकांसमोर कलात्मक रीतीनें सादर करण्यासाठीं अनुभवी cinematographer ची जरूर असते. ती तांत्रिक बाजू सांभाळायचं ठरवून मी East West Films चा पार्टनर झालों.

नीतिन: चित्रपटाच्या कथांसाठीं माझ्याकडे बऱ्याच कल्पना आहेत.

Darrel: एखादी कल्पना आम्हां चौघांना आवडली कीं आम्ही एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करून तिचं कथानकांत रूपांतर करतों.

Clark: मग पटकथाही तशीच एकमतानं आकार घेऊं लागते.

Darrel: चित्रपटकलेबद्दल चारही पार्टनर्सची मतं आणि आवडीनिवडी जुळताहेत हेंच East West Films च्या यशामागचं मुख्य कारण असावं. कंपनीचं नांवही असंच सुचलं. मी आणि नीतिन auditions साठीं New York ला एकत्र जात असतांना विचार करत होतों. आपण कंपनी तर सुरु केली पण नांव काय द्यायचं. आमच्या मनांत विचार घोळत होते कीं आपली कंपनी म्हणजे East आणि West या दोन संस्कृतींचा संगम आहे. अचानक दोघांनाही सुचलं East West Films आणि तिथेंच कंपनीचं नांव पक्कं झालं.

**मी: East West Films नं यापूर्वी चित्रपट बनवले आहेत का?**

नीतिन: हो. Clark, आपल्या पहिल्या चित्रपटाबद्दल बोलतोस का?

Clark: आमचा पहिला चित्रपट होता Prayer Life. माझ्याकडे लघुपटासाठी एक कल्पना होती. पण नीतिन आणि Darrel ला वाटलं ती संपूर्ण चित्रपटाला योग्य आहे. म्हणून मी पटकथा लिहायला घेतली. सर्वांच्या सूचना, कल्पना आणि परीक्षणामुळे तीन चार आवृत्या झाल्या आणि Prayer Life ची पटकथा तयार झाली. रुपेश आमचा cinematographer होता आणि Darrel नं बिझिनेसची बाजू सांभाळली.

नीतिन: चित्रपट चांगल्या दर्जाचा झाला. आंतरराष्ट्रिय फ़ेस्टिव्हल्समध्यें दाद मिळाली. आम्हांला हुरूप आला.

Clark: त्यानंतर आम्ही दोन documentaries बनवल्या आणि इतर कंपन्यांबरोबर भागीदारींत काम केलं.

नीतिन: “परतु” हा आमचा पहिलाच मराठी चित्रपट आहे.

# अमेरिकन निर्मात्यांचा मराठी चित्रपट “परतु”

## अशोक आंबर्डेकर (वॉशिंग्टन डीसी)

**मी:** **तुम्ही अमेरिकेंत राहणारे मग हा चित्रपट मराठींत कां?**

नीतिन: एक लहान राजस्थानी मुलगा कांही परिस्थितीनें मराठी शेतकऱ्याच्या आयुष्यांत येतो. मुलाला फक्त राजस्थानी भाषाच माहीत असते. त्याला मराठी बोलतां येत नसल्यामुळे कथेमध्यें जें नाट्य निर्माण होतं तें प्रेक्षकांना प्रभावीपणे सादर करण्यासाठी चित्रपट मराठीत असणंच आवश्यक होतं. शिवाय मी मराठी भाषिक महाराष्ट्रांतच वाढलेला, सुमारें पन्नास वर्षांपूर्वी आमच्याच कुटुंबांत घडलेली ही खरी कथा वडिलांच्या तोंडून ऐकलेली, कथा ज्या ग्रामीण परिसरांत घडली तिथलं जीवन जवळून पाहिलेलं. म्हणून मराठी मातींत घडलेली ही कथा मराठी चित्रपटातूनच प्रेक्षकांसमोर मांडायचं ठरवलं.

**मी:** **Darrel आणि Clark, भारतांतल्या ग्रामीण भागांत घडलेली ही कथा. तुम्हांला तर तिथली संस्कृती, भाषा, त्या वेळचं राहणीमान, इतिहास हें सर्व नवीन असूनही या कथेवर चित्रपट बनवायला तुम्हांला प्रेरणा कशी मिळाली?**

Clark: याचं सारं श्रेय मी कथेला देतो. “परतु” ची कथाच फार प्रभावी आहे. या कौटुंबिक कथेंत भावनांचा कल्लोळ आहे, मन पिळवटून टाकणारे प्रसंग आहेत, आयुष्यानें समोर टाकलेले पेंच समर्थपणे सोडवणारी पात्रं आहेत. म्हणून मी त्यावर पटकथा लिहायला आकर्षित झालों.

Darrel: अशा कथा तर भाषेच्या, कालमानाच्या आणि देशाच्याही पलीकडे जाउन जगांतल्या कोणत्याही प्रेक्षकाच्या मनाला स्पर्श करतात. म्हणून नितीननं कथेवर चित्रपट काढायचं म्हटल्याबरोबर मी लगेच होकार दिला.

नीतिन: Darrel आणि मी तर कथा प्रत्यक्षांत जिथे घडली त्या सर्व ठिकाणी गेलों. ज्या लोकांच्या आयुष्यांत हें नाट्य घडलं त्यांना भेटून त्यांच्या आठवणी ऐकल्या.

Darrel: त्यामुळे चित्रपट काढायला जोरदार चालना मिळाली. आम्ही दोघे उत्साहानें अमेरिकेला परतलों आणि “परतु” ची पूर्वतयारी सुरुं केली.

**मी:** **ही कथा मुंबई पुण्याच्या एखाद्या निर्मात्याला देण्याऐवजी चित्रपट स्वतःच काढायचा निर्णय कसा काय घेतलात?**

नीतिन: कां नाहीं? आमच्या East West Films नं याआधी दर्जेदार चित्रपट काढलेले आहेत. मुख्य म्हणजे मी स्वतः या कथेशी खूप जवळून निगडित आहे. म्हणून आमचा अमेरीकेंतला अनुभव वापरून हा चित्रपट भारतांत बनवायचं ठरलं.

**मी:** **तुमचे सर्व कलाकार भारतांतलेच आहेत का?**

नीतिन: निवडक भूमिकांसाठी मराठी चित्रपटसृष्टीतल्या नामांकित कलाकारांशी बोलणी सुरुं झालेली आहेत. अमेरीकेंतही Washington, New York आणि New Jersey ला auditions झाल्या. दोन्ही देशांतल्या कलाकारांना एकत्र घेऊन आम्ही हा चित्रपट बनवणार आहोंत.

**मी:** **वेगवेगळे तंत्रज्ञ कुठले असतील?**

नीतिन: सहदिग्दर्शक, cinematographer आणि story board artist हे मुंबईतलेच आहेत आणि त्यांनी pre-production च्या कामाला सुरुवातही केली आहे. कंपनीचं ऑफिस मुंबईला मालाड भागांत आहे.

Darrel: East West Films च्या नांवाला शोभेल असंच दोन्ही देशांतल्या कलाकारांच्या संगमानं आणि सहकार्यानं “परतु” चं काम सुरुं झालेलं आहे.

**मी:** **“परतु” हा चित्रपट धंदेवाईक असेल कीं आंतरराष्ट्रीय फ़ेस्टिव्हल्ससाठी बनवलेली एक आर्ट फिल्म?**

नीतिन: धंदेवाईक चित्रपट कलात्मकही असूं शकतो. “परतु” हा जगभरांतल्या प्रेक्षकांना आवडावा असा आमचा दर्जेदार धंदेवाईक चित्रपट असेल.

**मी:** **तुमच्याबरोबर बातचीत केल्यावर आतां मनांत खूप उत्सुकता निर्माण झाली आहे. आम्हांला “परतु” पडद्यावर केव्हां बघायला मिळणार?**

Darrel: आत्तां pre-production चं काम जोरांत चाललंय. भारतांत चित्रीकरण लवकरच सुरुं होईल. “परतु” २०१५ सालीं रिलीज होईल असा आमचा अंदाज आहे.

**मी:** **“परतु” पडद्यावर येईपर्यंत त्याच्याबद्दल माहिती हवी असेल तर तुमची website आहे का?**

Clark: हो तर. www.partumovie.com हा web site चा address आहे, Twitter वर https://twitter.com/partumovie आणि Facebook वर https://www.facebook.com/pages/PARTU/281692778675111

# अमेरिकन निर्मात्यांचा मराठी चित्रपट "परतु"

अशोक आंबर्डेकर (वॉशिंग्टन डीसी)

नीतिन: आमच्या web site ला आत्तांपर्यंत जवळ जवळ दोन लाख लोकांनी भेट दिली आहे. मला वाटतं अमेरिकन निर्माते आणि निराळी कथा यामुळे "परतु"बद्दल प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत त्याचाच हा परिणाम असावा.

**मी: East West Films त्या अपेक्षा शंभर टक्के पूर्ण करणार याची मला खात्री आहे. तुमच्या कथानकांत प्रेक्षकाचं मन काबीज करण्याचं सामर्थ्य दिसत आहे. त्यामुळे "परतु"ला जगन्मान्यता प्राप्त होवो अशा सदिछ्या प्रकट करून आणि तुम्हांला सुयश चिंतून आपली बातचीत इथेंच थांबवतो.**

***